महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा वर्ग १ विभागीय परीक्षेचे छत्रपती संभाजीनगर व कोकण विभाग स्तरावर आयोजन करणेबाबत, तसेच वेळापत्रक व उमेदवारांची यादी प्रसिध्द करणेबाबत.

महाराष्ट्र शासन,
वित्त विभाग,
संचालनालय, लेखा व कोषागारे,
कस्तुरी इमारत, तळमजला, जे.टाटा मार्ग,
पेट्रोलियम हाऊसच्या समोर, चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०.

परिपत्रक क्र. संलेको/परीक्षा-१७/मविलेसे वर्ग-१ विभागीय परीक्षा/२०२३/76 दिनांक :- 04 MAY 2023

संदर्भ :- १) संचालनालय, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई, यांचेकडील परिपत्रक क्र.संलेको/परीक्षा-२३/मविलेसे विभागीय परीक्षा/२०२३/५५ दि.२८ मार्च २०२३.
२) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. विपधो/२६२०/प्र क्र.१६/का.१७ दिनांक- ३१.०३.२०२१

महाराष्ट्र वित्त् व लेखा सेवा वर्ग -१ ह्या विभागीय परीक्षेचे आयोजन करणेबाबत या संचालनालयाकडून संदर्भीत परिपत्रक निर्गमीत करण्यात आलेले आहे. सदर परिपत्रकानुसार महाराष्ट्र वित्त् व लेखा सेवेच्या पात्र अधिकाऱ्यांकरिता महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा वर्ग-१ विभागीय परीक्षा (भाग-१ व भाग-२) ही अमरावती, छत्रपती संभाजीनगर, कोकण (मुंबई / नवी मुंबई), नागपूर, नाशिक व पुणे केंद्रावर नजिकच्या काळात घेण्यात येणार असलेबाबत कळविण्यात आलेले आहे. तसेच सदर परिक्षेला बसण्याची परवानगी मागण्यासाठीचा अर्ज दि.१५/०४/२०२३ रोजी पर्यंत संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांचेकडे पाठविणेबाबत कळविण्यात आलेले आहे.

या संचालनालयास दि.१५/०४/२०२३ रोजी पर्यंत प्राप्त झालेल्या अर्जाच्या तपशिलानुसार महाराष्ट्र वित्त् व लेखा सेवा वर्ग -१ ह्या विभागीय परीक्षेस बसणाऱ्या उमेदवारांची एकूण संख्या कमी असल्या कारणाने दि.२८/०३/२०२३ च्या परिपत्रकात नमुद केलेल्या सहा विभागांमध्ये परिक्षा केंद्र उपलब्ध करुन देणे व्यवहार्य होणार नाही.

महाराष्ट्र वित्त् व लेखा सेवा वर्ग -१ ह्या विभागीय परीक्षेस बसणाऱ्या उमेदवारांची संख्या पाहता सदरची परिक्षा ही आता केवळ छत्रपती संभाजीनगर व कोकण विभागातील दोन केंद्रावर घेण्यात येणार असून, सदर केंद्रांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

अ.क्र.	परीक्षा केंद्र	परिक्षा केंद्राचा संपूर्ण पत्ता	विभाग
१	छत्रपती संभाजीनगर	प्रशिक्षण सभागृह, सहसंचालक, लेखा व कोषागारे, छत्रपती संभाजीनगर विभाग यांचे कार्यालय, तिसरा मजला, लेखाकोष भवन, जिल्हाधिकारी कार्यालया शेजारी, छत्रपती संभाजीनगर.	छत्रपती संभाजीनगर, अमरावती व नागपूर विभागातील परिक्षार्थी.
२	कोकण (मुंबई / नवी मुंबई)	महाराष्ट्र वित्त व लेखा प्रशिक्षण केंद्र, नवीन प्रशासकिय इमारत क्र.२, दुसरा मजला, फाईन आर्टच्या बाजूला, चेंबूर (पुर्व), मुंबई - ४०० ०७१.	कोकण, पुणे व नाशिक विभागातील परिक्षार्थी.

केंद्रनिहाय यादी :-

महाराष्ट्र वित्त् व लेखा सेवा वर्ग -१ ह्या विभागीय परीक्षेस बसण्यात आलेल्या अधिकाऱ्यांच्या नावांची ***परीक्षा केंद्रनिहाय*** अंतरिम यादी परिशिष्ट - अ नुसार सहपत्रित करण्यात आली असून सदरची परीक्षा उपरोक्त छत्रपती संभाजीनगर व कोकण विभाग स्तरावर घेण्यात येणार आहे. सदर यादीतील तपशिलामध्ये काही त्रुटी आढळल्यास त्याबाबतची सुधारणा करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी सहसंचालक (प्रशासन), संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांचेकडे दि.१०/०५/२०२३ रोजी पर्यंत कार्यालयीन वेळेपर्यंत jd.admin@mahakosh.in या ई-मेल पत्त्यावर मेलद्वारे कळवावे.

वेळापत्रक :-

महाराष्ट्र वित्त् व लेखा सेवा वर्ग -१ ह्या विभागीय परीक्षेचे आयोजन दि.३० मे २०२३ ते दि.०२/०६/२०२३ या कालावधीत करण्यात येणार असून सदर परीक्षेचे तपशिलवार वेळापत्रक परिशिष्ट - ब नुसार प्रसिध्द करण्यात येत आहे.

उमेदवारांसाठी मार्गदर्शक सूचना :-

महाराष्ट्र वित्त् व लेखा सेवा वर्ग -१ विभागीय परीक्षेच्या अनुषंगाने परिक्षार्थीकरिता सर्वसाधारण सूचना परिशिष्ट - क मध्ये नमूद करण्यात आलेल्या आहेत.

प्रवेश पत्राचा नमूना :-

महाराष्ट्र वित्त् व लेखा सेवा वर्ग -१ विभागीय परीक्षेला बसण्यासाठी उमेदवाराने त्याच्या सध्याच्या कार्यालय/विभाग प्रमुखाकडून यासोबत देण्यात आलेल्या परिशिष्ट - ड मधील नमुन्यामध्ये देण्यात आलेले प्रवेशपत्र परीक्षेच्या दिवशी आणणे बंधनकारक आहे.

(वैभव राजेघाटगे)
संचालक, लेखा व कोषागारे,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रति,

मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन,मुंबई ४०० ०३५.
मंत्रालयातील सर्व विभाग / सर्व विभाग प्रमुख.
सर्व विभागांचे आयुक्त.
सर्व जिल्हाधिकारी.
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, कोकण भवन,नवी मुंबई.
सहसंचालक, लेखा व कोषागारे पुणे / नाशिक / नागपूर / अमरावती / छत्रपती संभाजीनगर / कोकण विभाग.
सहसंचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, पुणे/नाशिक/नागपूर/अमरावती/ छत्रपती संभाजीनगर/कोकण विभाग
अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई
वित्तीय सल्लागार आणि उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,मुंबई.
सर्व कोषागार अधिकारी.
सहाय्यक संचालक (प्रशिक्षण) अमरावती/छत्रपती संभाजीनगर/कोकण/नागपूर/नाशिक/पुणे.
सर्व उपमुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा कार्यालये.
परीक्षेस बसणारे सर्व उमेदवार व त्यांचे कार्यालय प्रमुख.
इतर कार्यालये.

परिशिष्ट - अ

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा वर्ग-१ विभागीय परीक्षा (भाग-१ व भाग-२)

परिक्षा केंद्र : छत्रपती संभाजीनगर

अ.क्र.	सेवार्थ क्र.	कर्मचाऱ्याचे नाव	पदनाम	कार्यालय	भाग-१ (पेपर क्र.)				भाग-२ (पेपर क्र.)			
					१	२	३	४	१	२	३	४
१	DATARIM7801	श्री.अभिजित रामकृष्ण इटोलीकर	लेखाधिकारी	समग्र शिक्षा अभियान, जिल्हा परिषद, लातूर	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र
२	DATKHRM7801	श्री.करणसिंग हरिशचंद्र राजपूत	लेखाधिकारी	लेखाधिकारी (शिक्षण), बीड	सूट	सूट	पात्र	सूट	उत्तीर्ण	उत्तीर्ण	उत्तीर्ण	उत्तीर्ण
३	DATVSDM7801	श्री.विक्रम सुरेशराव देशमुख	लेखाधिकारी	राज्य उत्पादन शुल्क, नांदेड	सूट	सूट	सूट	पात्र	उत्तीर्ण	उत्तीर्ण	उत्तीर्ण	उत्तीर्ण
४	DATSDMM8501	श्री.साईनाथ दिगंबर मुटकुळे	लेखाधिकारी	सहसंचालक, लेखा व कोषागारे, छत्रपती संभाजीनगर	सूट	सूट	सूट	पात्र	उत्तीर्ण	उत्तीर्ण	उत्तीर्ण	उत्तीर्ण
५	HCDSUDM7001	श्री.सतिश उत्तमराव दोडके	लेखाधिकारी	जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र
६	DATNNAM8101	श्री.नंदकिशोर निवृत्ती अंजाण	लेखाधिकारी	जिल्हाधिकारी कार्यालय, बीड	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र
७	DATAPSM6701	श्री.अरुण प्रभाकरराव सोनुने	लेखाधिकारी	स्थानिक निधी लेखा परिक्षा, लातूर	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र
८	XRVSHSM7501	श्री.शेख समद हमीदसाहेब	लेखाधिकारी	लातूर शहर महानगरपालिका, लातूर	पात्र	उत्तीर्ण	पात्र	उत्तीर्ण	उत्तीर्ण	उत्तीर्ण	उत्तीर्ण	उत्तीर्ण
९	MLJDKRM7101	श्री.दत्तात्रय कोंडीबा राऊत	लेखाधिकारी	जल जीवन मिशन, जिल्हा परिशद, लातूर	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र
१०	DATCSGM7301	श्री.चंद्रसेन श्रीधर गिदे	लेखाधिकारी	उपविभागीय कृषी अधिकारी यांचे कार्यालय, बीड	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र
११	DVERSWM6801	श्री.रविंद्र सहदेवराव वानखेडे	लेखाधिकारी	सहसंचालक, लेखा व कोषागारे, अमरावती	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र
१२	CCFBWKM7801	श्री.भुपेंद्र वासुदेवराव खरपीकर	लेखाधिकारी	उपविभागीय कृषी अधिकारी, अकोला	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र
१३	DATSGAM7101	श्री.संजय गुलाबराव अंबाडेकर	लेखाधिकारी	प्रादेशिक परिवहन कार्यालय, अमरावती	उत्तीर्ण	उत्तीर्ण	उत्तीर्ण	उत्तीर्ण	पात्र	पात्र	पात्र	पात्र
१४	FDSGRGM7701	श्री.गणेश रामदास गवळी	लेखाधिकारी	शिक्षणाधिकारी (प्रा.), जिल्हा परिषद, वाशिम	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र
१५	DATNGKM6701	श्री.नरेंद्र गजाननराव कुंभलकर	लेखाधिकारी	प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास अधिकारी यांचे कार्यालय, नागपूर	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र
१६	DATNMKM6801	श्री.नामदेव मारोती कुसराम	लेखाधिकारी	जिल्हा कोषागार कार्यालय, गडचिरोली	सूट	सूट	पात्र	सूट	उत्तीर्ण	उत्तीर्ण	उत्तीर्ण	उत्तीर्ण

(वैभव राजेघाटगे)
संचालक
लेखा व कोषागारे

परिशिष्ट - अ

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा वर्ग-१ विभागीय परीक्षा (भाग-१ व भाग-२)

परिक्षा केंद्र : कोकण (मुंबई)

अ.क्र.	सेवार्थ क्र.	कर्मचाऱ्याचे नाव	पदनाम	कार्यालय	भाग-१ (पेपर क्र.)				भाग-२ (पेपर क्र.)			
					१	२	३	४	१	२	३	४
१	DATJJSM7601	श्री.जितेंद्र जयहिंद साखरकर	लेखाधिकारी	अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, मुंबई	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र
२		श्री.रोहन बाळासाहेब शेटे	लेखाधिकारी	अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र
३	MPSAMSF7601	श्रीमती अश्विनी मंगेश सुर्वे	लेखाधिकारी	जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र
४	DATKMWF7701	श्रीमती कल्पना मदन वाघ	लेखाधिकारी	महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, चर्नी रोड, मुंबई	पात्र	पात्र	पात्र	पात्र	फक्त भाग १ करीता अर्ज केला आहे.			
५	RTNKSDF7801	श्रीमती कविता सुयश देशपांडे	लेखाधिकारी	अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र
६	RTNMMAF7801	श्रीमती मनाली महेश आरोलकर	लेखाधिकारी	व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र
७	DATSRTF7101	श्रीमती शुभांगी राजेंद्रनाथ तपासे	लेखाधिकारी	सहसंचालक (मनपालेप), स्थानिक निधी लेखा परिक्षण, कोकण भवन, नवी मुंबई	सूट	पात्र	सूट	सूट	उत्तीर्ण	उत्तीर्ण	उत्तीर्ण	उत्तीर्ण
८	SECPSKF8001	श्रीमती प्राजक्ता स्वानंद कुलकर्णी	लेखाधिकारी	राज्य निवडणूक आयोग मुंबई	फक्त भाग २ करीता अर्ज केला आहे.				पात्र	पात्र	पात्र	पात्र
९	RTNNNSF7302	श्रीमती नीता नरेंद्र सावंत	लेखाधिकारी	महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, बेलापूर, नवी मुंबई	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र
१०	DATAVTM6601	श्री.अशोक विठोबा तांबे	लेखाधिकारी	प्रधान मुद्रांक कार्यालय, मुंबई	पात्र	सूट	सूट	सूट	उत्तीर्ण	उत्तीर्ण	उत्तीर्ण	उत्तीर्ण
११	DATSMDF7301	श्रीमती सज्जला प्रफुल्ल विसपुते	लेखाधिकारी	आयुक्त दुग्धव्यवसाय विकास कार्यालय, वरळी, मुंबई	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र
१२	DATPVWM7501	श्री.प्रविणकुमार वसंत वाघ	लेखाधिकारी	अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र
१३	DATGRSM8201	श्री.गोविंद रामराव सुर्यवंशी	लेखाधिकारी	झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई	पात्र	सूट	पात्र	पात्र	पात्र	सूट	सूट	सूट
१४	RTNHJGF7301	श्रीमती हर्षदा जितेंद्र गोगटे	लेखाधिकारी	भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा, कोकण भवन	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र
१५	FDASKSM7201	श्री. शिवाजी कृष्णा शेलार	लेखाधिकारी	झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र
१६	DEDDSKM7601	श्री.ज्ञानदेव सोमा कचरे	लेखाधिकारी	ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र

(वैभव राजेघाटगे)
संचालक
लेखा व कोषागारे
महाराष्ट्र शासन, मुंबई

अ.क्र.	सेवार्थ क्र.	कर्मचाऱ्याचे नाव	पदनाम	कार्यालय	भाग-१ (पेपर क्र.)				भाग-२ (पेपर क्र.)			
					१	२	३	४	१	२	३	४
१७	RTNSVGF7301	श्रीमती सुवर्णा विजय गुजर	लेखाधिकारी	आभासी कोषागार कार्यालय, मुंबई	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र
१८	DATJCAM7301	श्री.जितेंद्र चंद्रकांत आरेकर	लेखाधिकारी	विधान मंडळ, सचिवालय, मुंबई	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र
१९	TDCNRBM7801	श्री.नरेंद्र रमेश भोपे	लेखाधिकारी	जिल्हाधिकारी कार्यालय, नंदुरबार	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र
२०	DATANBF7601	श्रीमती आरती नथू मोई	लेखाधिकारी	उपकोषागार कार्यालय, कळवन	पात्र	पात्र	पात्र	पात्र	फक्त भाग १ करीता अर्ज केला आहे.			
२१	DATBBKM7801	श्री.भगवान बुधा कोळपे	लेखाधिकारी	समग्र शिक्षा, जिल्हा परिषद, नंदुरबार	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र
२२	DGPSBCM7601	श्री.सुनिल भगवान चौधरी	लेखाधिकारी	आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक	पात्र	सूट	सूट	पात्र	उत्तीर्ण	उत्तीर्ण	उत्तीर्ण	उत्तीर्ण
२३	DATKMPM7401	श्री.खलील मेहमुद पटेल	लेखाधिकारी	आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र	पात्र
२४	DATRGWF8701	श्रीमती रोहिणी रतन बाड	लेखाधिकारी	जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा	पात्र	सूट	सूट	सूट	उत्तीर्ण	उत्तीर्ण	उत्तीर्ण	उत्तीर्ण
२५	DGPNSKM6902	श्री.नंदकुमार सुर्यकांत कुलकर्णी	लेखाधिकारी	प्रादेशिक उपायुक्त समाज कल्याण, पुणे	सूट	सूट	पात्र	पात्र	पात्र	सूट	सूट	सूट

(वैभव राजेघाटगे)
संचालक
लेखा व कोषागारे
महाराष्ट्र शासन, मुंबई

परिशिष्ट - ब

महाराष्ट्र शासन,
संचालनालय, लेखा व कोषागारे,
मुंबई.

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा वर्ग-१ विभागीय परिक्षा, मे २०२२
वेळा पत्रक

परिक्षेचा भाग	वार व दिनांक	वेळ	पेपर क्रमांक व विषय
भाग - १	मंगळवार दिनांक ३० मे २०२३	सकाळी १०.०० ते १.००	पेपर क्रमांक १ - प्रेसी ॲन्ड ड्राफ्टींग (पुस्तकांशिवाय)
		दुपारी २.३० ते ५.३०	पेपर क्रमांक २ - महाराष्ट्र सिव्हिल सर्व्हिसेस रुल्स वगैरे (पुस्तकांसह)
	बुधवार दिनांक ३१ मे २०२३	सकाळी १०.०० ते १.००	पेपर क्रमांक ३ - इंट्रोडक्शन टू इंडियन गव्हर्मेंट अकाऊन्ट्स आणि ऑडिट वगैरे (पुस्तकांशिवाय)
		दुपारी २.३० ते ५.३०	पेपर क्रमांक ४ - कमर्शिअल बुक-किपिंग (पुस्तकांशिवाय)
भाग - २	गुरुवार दिनांक ०१ जून २०२३	सकाळी १०.०० ते १.००	पेपर क्रमांक ५ - कॉन्स्टिटयुशन ऑफ इंडिया (पुस्तकांशिवाय)
		दुपारी २.३० ते ५.३०	पेपर क्रमांक ६ - बॉम्बे फायनान्शियल रुल्स, महाराष्ट्र ट्रेझरी रुल्स इत्यादी (पुस्तकांसह)
	शुक्रवार दिनांक ०२ जून २०२३	सकाळी १०.०० ते १.००	पेपर क्रमांक ७ - अकाऊन्ट्स कोड,भाग १ वगैरे (पुस्तकांसह)
		दुपारी २.३० ते ५.३०	पेपर क्रमांक ८ - महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समित्या ॲक्ट, १९६१ वगैरे (पुस्तकांसह)

(वैभव राजेघाटगे)
संचालक
लेखा व कोषागारे
महाराष्ट्र शासन, मुंबई

परिशिष्ट - क

-: उमेदवारांसाठी सर्वसाधारण सूचना :-

१) ज्या उमेदवारांना संचालनालयाने परिक्षेस बसण्यास परवानगी दिली आहे त्यांना त्यांचे वरिष्ठांमार्फत परिक्षा प्रवेशपत्र (सध्या कार्यरत असलेल्या कार्यालयामार्फत) व उमेदवारांना सूचनांची प्रत देण्यात येईल. प्रवेशपत्र तसेच ओळखपत्र दाखविल्याशिवाय उमेदवारांना परिक्षा कक्षात व परिक्षेस प्रवेश मिळणार नाही.

२) उत्तरे लिहिण्यासाठी मुख्य उत्तरपुस्तिकेव्यतिरीक्त पुरवणी म्हणून अन्य उत्तरपुस्तिका उपलब्ध करुन दिली जाणार नाही.

३) उमेदवारांनी अनधिकृत कागदपत्रे व पुस्तके व इतर वस्तू जवळ न बाळगणे :- ज्या प्रश्नपत्रिकाची उत्तरे पुस्तकांच्या सहाय्याने लिहावयाची आहेत अशा प्रश्नपत्रिकांचे वेळी उमेदवारांनी विभागाने अधिकृत केलेली (सोबतच्या यादीत नमूद केलेली) व त्यांची स्वत:ची (यथास्थिती केवळ बेअर ॲक्टस् आणि (किंवा रुल्स) आणून वापरावीत. परंतु परीक्षेसाठी असलेल्या कोणत्याही प्रश्नपत्रिके वरील टिपण्या असलेली पुस्तके, मार्गदर्शिका व खाजगी प्रकाशनांची पुस्तके वापरण्यास सक्त मनाई आहे. या खेरीज पेजर, मोबाईल, इअर फोन इत्यादी संपर्काची साधने परीक्षा कक्षात आणण्यास व वापरण्यास तसेच प्रोगामेबल कॅलक्युलेटर वा इतर वस्तू परीक्षा कक्षामध्ये आणण्याची उमेदवारांना सक्त मनाई आहे. असे अनधिकृत साहित्य उमेदवाराजवळ सापडल्यास ते नक्कल करण्याच्या उददेशाने जवळ बाळगला असे समजण्यात येईल. सदर सूचनेचे उल्लंघन झाल्याचे आढळल्यास ती बाब शिस्तभंग असल्याचे समजण्यात येईल व लेखा व कोषागारे, संचालनामार्फत तसेच विभागामार्फत कारवाई केली जाईल. उमेदवारांना लेखा व कोषागारे, संचालनाकडून कोणतीही पुस्तके पुरविली जाणार नाहीत.

४) परिक्षेच्या नियमामध्ये प्रमाणित केल्याप्रमाणे उमेदवारांना प्रश्नाची उत्तरे इंग्रजीत किंवा मराठीत लिहिण्याची मुभा आहे. परंतू उत्तरपुस्तिकेत ज्या भाषेत उत्तरे लिहिणे सुरु केले असेल त्याच भाषेत शेवटपर्यंत उत्तरे लिहिली पाहिजेत. परिक्षेच्या प्रश्नपत्रिका मराठी व इंग्रजी भाषेतच काढल्या जातील.

५) सदर परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांमध्ये काही दोष आढळल्यास त्या संबधीचे लेखी निवेदन उमेदवाराने संचालक, लेखा व कोषागारे, यांच्याकडे स्वत:च्या तपशीलासह टपालाने परीक्षेच्या दिनांकापासून आठ दिवसाच्या आत विभाग प्रमुखाच्या मार्फत सादर करावे तदनंतर आलेली निवेदन विचारात घेतली जाणार नाही.

६) परीक्षेचा निकाल घोषित झाल्यावर गुणांची फेरतपासणी करण्यासाठी प्रत्येक विषयाच्या उत्तरपुस्तिकेचे फेरतपासणी शुल्क रुपये १००/- आहे. ते कोर्ट फी स्टॅम्प स्वरुपात को-या पानावर चिकटवून फेरतपासणी करावयाच्या विषय क्रमांक, विषय नमूद करुन, निकाल प्रसिद्ध केल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांचेकडे पाठवावेत. विहीत दिनांकांनंतर प्राप्त झालेल्या अर्जांवर कार्यवाही केली जाणार नाही.

७) उत्तरपुस्तिकेतील उत्तरांचे पुनर्मुल्यांकन करण्यात येणार नाही.

८) परीक्षेत अनधिकृत साहित्या आधारे नक्कल करण्यास किंवा दुस-या उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेवरुन नक्कल करण्यास वा दुसऱ्या उमेदवाराकडून नियमबाहय मदत घेण्यास किंवा दुस-या उमेदवाराला

नियमबाहय मदत देण्यास अथवा तसा प्रयत्न करण्यास अथवा वारंवार आपल्या जागेवरुन उठण्यास सक्त मनाई आहे. खाजगी प्रकाशनाची पुस्तके वापरल्यास या सूचनेचे उल्लंघन करणारा उमेदवार शिस्तभंग तरतुदी अन्वये कारवाईस पात्र ठरेल.

९) संचालनालयाची उत्तर पुस्तिका ही संचालनालयाची मालमत्ता असून ती अनधिकृतरित्या हाताळणे व स्वत: जवळ बाळगणारी व्यक्ती कारवाईस पात्र ठरेल.

१०) संचालनालयाने विभागीय परीक्षेसंदर्भाने केलेल्या सर्व सूचनांचे उमेदवाराने अत्यंत काळजीपूर्वक पालन करावे. सूचनांचे पालन न करणारा उमेदवार परीक्षा कक्षाबाहेर घालवून देणे, गुण वजा करणे, पुढील परीक्षांना प्रतिरोधित करणे, उमेदवारी रदद करणे, इत्यादी शिक्षा देण्यास पात्र ठरेल. शिक्षा देण्याचा अधिकार सर्वस्वी संचालनालयाचा राहील.

११) महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा विभागीय परिक्षेला बसलेल्या अधिकाऱ्याला या परिक्षेत उत्तीर्ण होण्यासाठी दोन्ही भागांच्या (म्हणजेच भाग -१ व भाग -२) प्रत्येक विषयात एकूण गुणांच्या ५० टक्के गुण हे परीक्षेत उत्तीर्ण होण्याचे मानक असेल.

संचालक,
लेखा व कोषागारे,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

परिशिष्ट - ड

प्रवेश पत्र

श्री/श्रीमती/कुमारी----------यांना संचालनालय, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या मार्फत दिनांक ३०/०५/२०२३ ते दि.०२/०६/२०२३ मध्ये घेण्यात येणा-या महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा वर्ग-१ विभागीय परीक्षेस बसण्यास प्रवेश देण्यात येत आहे. त्यांची साक्षांकित स्वाक्षरी खाली देण्यात आली आहे.

पूर्वी----------मधे झालेल्या परीक्षेत पेपर / समुह क्रमांक ---------- मध्ये मिळालेल्या सुटीचा लाभ त्यांना देण्यात येत आहे.

उमेदवाराचा परीक्षेतील बैठक क्रमांक ---------- आहे.

उमेदवारांसाठी असलेल्या सुचना व मार्गदर्शिका त्यांनी काळजीपुर्वक वाचाव्या व त्यांचे काटेकोरपणे पालन करावे.

परीक्षेला प्रवेश मिळण्यासाठी हे प्रवेश पत्र दररोज परीक्षागृहात आणावे. प्रवेशपत्र दाखविल्याशिवाय परीक्षेला प्रवेश मिळणार नाही.

उमेदवाराची स्वाक्षरी

साक्षांकित करणा-या अधिका-याची सही व हुददा

(अधिका-याची सही व हुददा)